दूरध्वनी क्र ०२२-२२८१३८२६
email- anil.chaudhri@nic.in
Email ID : anil.chaudhri@nic.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
दालन क्रमांक ७०७ (विस्तार), मंत्रालय,
मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरू चौक
मुंबई- ४०० ०३२.

**क्रमांक : अप्रदा -१८२४ /प्र.क्र. २७ /१३-स** **जाहिरात क्रमांक १/ २०२४**

**आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे रिक्त होणारे पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यासाठीची जाहिरात.**

आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे रिक्त होणारे पद भरावयाचे आहे. (दरमहा अनुज्ञेय वेतन रुपये २,२५,०००/-). आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे या पदास अनुसरून महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण (आयुक्तांच्या सेवाशर्ती) नियम, २०१४ दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये निश्चित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३कब नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची दिनांक ३० मार्च,२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापना करण्यात आली आहे.

दिनांक ११ सप्टेंबर,२०१४ रोजीच्या अधिसूचनेत आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पदावधीबाबत नियम ४ मध्ये, आयुक्त, तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील आणि त्याची दोन वर्षांच्या आणखी कालावधीसाठी पुनर्नियुक्ती करता येईल; परंतु, आयुक्त वयाची पासष्ट वर्ष पुर्ण झाल्यावर पदावरून निवृत्त होईल. तसेच, दिनांक ३१ ऑक्टोबर,२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयुक्त या पदावर नियुक्त केला जाणारा उमेदवार हा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील किमान सचिव दर्जाचा अधिकारी यांमधून नियुक्त करण्यात येईल यांस अनुसरून इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहिरात शासनाच्या

www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७.०२.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, इच्छूक उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये आपला अर्ज जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत प्रत्यक्ष / कुरिअर/ स्पीडपोस्ट किंवा नोंदणीकृत डाकेने, अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ यांच्या नावे सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**ठिकाण:- मुंबई**

**दिनांक:- २७.०२.२०२४**

**(अनिल ज.चौधरी)** २७.०२.२०२४

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

# <u>जोडपत्र</u>

**(शासन पत्र क्रमांक:- अप्रदा-१८२४/ प्र.क्र.२७/१३-स, दिनांक २७.०२.२०२४ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र)**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयातील आयुक्त या पदासाठी अर्जाचा नमूना**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | |
| २ | जन्म दिनांक | |
| ३ | सध्याचा पत्ता | |
| ४ | दुरध्वनी क्रमांक | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ६ | ई-मेल | |
| ७ | कायमचा मुळ पत्ता | |
| ८ | निवृतीवेळी किंवा त्याआधी धारण केलेले पद | |
| ९ | वेतनश्रेणी/ वेतन | |
| १० | निवृत्तीचा दिनांक | |

**११ शैक्षणिक पात्रता**

| अ.क्र. | परीक्षा | विषय | वर्ष | श्रेणी | मंडळ/ विद्यापीठ |
|---|---|---|---|---|---|
| | पदवी / पदव्युत्तर पदवी | | | | |
| | पीएच.डी/ डॉक्टरेट | | | | |
| | इतर शैक्षणिक पात्रता | | | | |

**१२ राज्य / केंद्र शासनातील अनुभव**

| अ.क्र. | विभाग | कालावधी | धारण केलेले पद | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

| | |
|---|---|
| **१३** | **मुल्यांकन अहवाल/ गोपनीय अहवाल (लगतच्या ५ वर्षांचे)** |
| **१४** | एखादा राष्ट्रीय, राज्य स्तरीय अथवा इतर पुरस्कार मिळाला असल्यास त्याबाबतचा तपशील. |
| **१५** | सेवाकाळात कोणतीही विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणतीही कार्यवाही प्रलंबित / चालू असल्यास त्याबाबतचा तपशील. |

d:\vivek\२०२१\पत्र\२०२४\राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण जाहिरात\जाहिरात.docx

| | |
|---|---|
| १६ | उपरोक्त नमूद व्यतिरिक्त इतर तपशील( असल्यास) |

**दिनांक:-**

**ठिकाण :-** **(उमेदवाराची सही आणि नाव)**

**<u>घोषणा</u>**

मी----------------- गांभीर्यपूर्वक असे प्रमाणित करतो/ करते की या अर्जामध्ये भरलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

दिनांक:-

ठिकाण:- **(उमेदवाराची सही आणि नाव)**